आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात
E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २०९ वा ● रविवार दि. १९ जानेवारी २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – अहो, बारामती प्रमाणेच मराठवाड्याचा विकास करणार असे स्पष्टीकरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले त्या बारामती येथील कबड्डी स्पर्धेची उद्घाटन सोहळ्यासाठी उपस्थित असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कोड कौतुक करून त्यांनी अशी ग्वाही दिली. यातले गुपित काय असावे हेच कळत नाही. डोकं बधिर झालय.

दुसरा – अरे, यात गुपित वगैरे काहीच नाही अजित पवार हे अर्थमंत्री असल्याने त्यांच्याकडेच निधी वाटपाचे अधिकार असतात म्हणून तशी स्तुती सुमने उधळावीच लागतात म्हणून ना. पंकजा मुंडे यांनी बोलले असावे त्यात आश्र्चर्य काय, गप्प बस ना.

एक – अहो, बारामतीत जाऊन मराठवाड्याच्या विकासाची भाषा करणे ही काही साधी बाब नाही, मंत्री मुंडे ताईचे धाडसच म्हणावे लागेल, सत्य स्वीकारणे आणि हा असत्य नाकारण्यासाठीही हिम्मत लागते म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, ताई बाई म्हणून कशाला डोकं खाजवीत बसतोस. महाराष्ट्राच्या सत्ताकारणात यशवंतराव चव्हाण यांचे पासून जे कोणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदार झाले आहेत, त्यांनी मराठवाड्यासाठी काहीच केले नाही, हे मंत्री पंकजा मुंडे काय करणार आहेत. कशाला बडबड करतो आहेस.

एक – अहो, चिडचिड कशाला करता, त्या गोपीनाथराव मुंडे यांच्या कन्या आहेत. आमदार मंत्री म्हणून जनसेवा केल्यानंतरही त्या विजनवासात होत्या, पण भाजपात राहून त्या श्रेष्ठीवर उघड बोलत होत्या, म्हणून त्यांना पुन्हा मंत्रीपदाची संधी मिळाली आहे. यातूनच त्यांचे धाडस आणि कार्यशाली स्पष्ट होते. म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, कशाला डोकं खातोस, दिवंगत विलासराव देशमुख आणि गोपीनाथ मुंडे यानी मतदार संघा पलीकडे काहीच केले नाही. पंकजाताई मुंडे या मराठवाड्यासाठी काय करणार आहेत. मंत्रीपद सांभाळण्यासाठीची ती विकासा मागची कसरत आहे, हेच वास्तव आहे, समजलं.

## काय बोलता राव ?

लोकसंख्या नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक वर्षापासून तत्कालीन केंद्र सरकार सह विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कार्यरत असतानाच केंद्र सरकारमधील सहयोगी घटक पक्षाचे नेते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी मात्र आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दोन पेक्षा अधिक अपत्य असलेल्या कार्यकर्त्यांनाच निवडणूक लढविता येईल असे तिरुपती मधील नवरी पल्ले येथे पत्रकारांशी संवाद साधताना स्पष्ट केल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनाच धक्का सत्ता घरचा आहेर मानला जातो आहे.

**काय बोलता राव !**

लोकसभा निवडणुकीनंतर भाजपा नरेंद्र मोदी यांची अवस्था दोलाईमान झाली होती त्यावेळी चंद्रबाबू नायडू आणि नितीश कुमार यांनी मोदीजींना तारले आणि तेव्हापासूनच नायडू, नितीश कुमार हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना करंगळीवर नाचवीत आहेत. आज घडीला तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनाच लोकसंख्या नियंत्रणालाच आव्हान देऊन लोकसंख्या वाढविण्याचे आदेशच चंद्रबाबू नायडू यांनी संकेत दिल्याने, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे राजकीय गुरु शरद पवार यांचीच तरंगुळी मोदीजींना आठवत असेल, तर त्यात नवल कसले, मग बोला दाजीबा!चुकीचे वाटते, परंतु भाजपाच्या लक्षात येतच नाही, भारत स्वातंत्र्य कसा झाला हा इतिहास मोडीत काढून मुक्या, बहिऱ्या पाशांनी राम मंदिराच्या नावाखाली त्याच दिवशी भारत स्वतंत्र झाला असे म्हणणे म्हणजे, नाकाने कांदे सोलण्यासारखेच असावे असे म्हटल्यास वावगे ठरू नये मग बोला दाजीबा.




## स्वामित्व योजनेंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सनद वितरणाचा शुभारंभ

मुंबई : स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून यामुळे त्यांच्या आशा–आकांक्षा पूर्ण होत आहेत. स्वामित्व योजनेंतर्गत जनतेला देण्यात आलेल्या कायदेशीर सनदेमुळे त्यांना मदत होत असून या सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितले.




केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सह्याद्री अतिथीगृह येथून ऑनलाईन उपस्थित होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, भूमी अभिलेख जमाबंदी आयुक्त व संचालक डॉ.सुहास दिवसे, विभागीय आयुक्त राजेश देशमुख तसेच पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते.

देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकाजवळ मालमत्तेचे अधिकार असणे गरजेचे आहे असे सांगून प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, देशातील लाखभर लोकांकडे संपत्ती असूनही त्यास किंमत मिळत नव्हती. स्वत:चे घर असूनही काही लोक त्यावर कब्जा करत होते. २०१४ पासून आम्ही देशातील ड्रोनद्वारे सर्वेक्षण करून नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड वितरित करत आहोत. यामुळे लोकांचे जीवन बदलणार असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले. स्वामित्व योजनेंतर्गत या प्रॉपर्टी कार्डमुळे देशातील भ्रष्टाचार कमी होणार आहे. आज ९८ टक्के भूमी अभिलेखाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज गावोगावी शौचालये, उज्वला गॅस, जलपुरवठा, आयुष्यमान, सडके, इंटरनेट, ब्रॉडबँडसोबत कॉमन सर्व्हिस सेंटर या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. शहरामध्ये मिळणाऱ्या सुविधा आता गावात मिळत आहे. देशातील गरीब सशक्त झाला तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

**प्रधानमंत्री स्वामित्व योजनेतून ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणास चालना – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

प्रधानमंत्री स्वामित्व योजनेच्या पथदर्शी प्रकल्पात महाराष्ट्राचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्र्वास' असा दृष्टिकोन आहे. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या प्रगतीचा आधार आहे, ही जाणीव ठेवूनच स्वामित्व योजना आखण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ६० लाखांहून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल. ही योजना केवळ शासकीय उपक्रमापुरती मर्यादित नसून, ती ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय प्रणालीत आमूलाग्र बदल घडविणारी आहे. ग्रामीण भागातील जमिनीच्या मालकीबाबतची अनिश्र्चितता आणि वाद कमी होणार आहेत. अनेकांना जमिनींचा कायदेशीर हक्क सिद्ध करणे कठीण जाते. यामुळे केवळ न्यायालयीन प्रकरणे वाढतात. अनेकदा विकास प्रक्रियादेखील थांबते. या समस्येचे स्वामित्व योजनेमुळे निराकरण होईल. या योजनेद्वारे गावांतील जमिनींची मोजणी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने केली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या मालकीच्या जमिनीचे कायदेशीर प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र केवळ मालकीचा पुरावा नसून, आर्थिक सक्षमीकरणाची मोठी संधी ठरेल, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

स्वामित्व योजनेंतर्गत राज्यपाल श्री. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील विनोद आत्माराम पिंपळे, माया विकास पिंपळे, सदानंद वामन पिंपळे, दिलीप यशवंत सपाटे, प्रकाश शांताराम रावते, अलिबाग जिल्ह्यातील रोहण कृष्णा पाटे, शैलेश यशवंत ठाकूर, मिलिंद पांडुरंग पडते, प्रभाकर शांताराम नाईक, अंकुश सिताराम धाके आणि ठाणे जिल्ह्यातील विष्णू चुरू आंबेकर, यमुनाबाई रामचंद्र पाटील, मधुकर तुकाराम पाटील आणि चेतन गजानन पाटील यांना सनद वाटप करण्यात आले.

## आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते रक्तदान करून रक्तदान महायज्ञाचे उदघाटन.



औसा – जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने १ लक्ष रक्त बॉटल्स संकलित केल्या जात असून याच स्तुत्य उपक्रमाअंतर्गत (दि.१८) जानेवारी रोजी औसा ग्रामीण रुग्णालयात रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी रक्तदान करून रक्तदान महायज्ञाचे उदघाटन केले.यावेळी २०० हून अधिक लोकांनी रक्तदान केले.

राज्यातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानने रक्तदान महायज्ञाच्या माध्यमातून रक्तदात्यांकडून १ लक्ष बॉटल्स रक्त संकलित करण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाअंतर्गत ८३ हजार बॉटल्स रक्त संकलित करण्यात आले असून याच उपक्रमाचा भाग म्हणून औसा ग्रामीण रुग्णालय येथे शनिवारी सकाळी ८ वाजल्यापासून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष सुनील उटगे,रोहयो तालुका अध्यक्ष सदाशिव जोगदंड, बाजार समितीचे संचालक विकास नरहरे,स्व–स्वरुप संप्रदायचे लातूर जिल्हाध्यक्ष तुकाराम गुडले, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख बल्लाळनाथ शिंदे, कृष्णा पांचाळ ,कण्टेआण्णा मुळे, प्रा. शिवरुद्र मुर्गे, ॲड योगेश शिंदे, सागर भंडारी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.हे शिबीर यशस्वीरित्या संप्पन करण्यासाठी जनम प्रवचनकार संजय उजळंबे, औसा तालुका सेवा समितीचे युवा प्रमुख गणेश बिराजदार, महिलाध्यक्ष साधना पवार, तुलशीदास मलवाड, रत्नाकर पोतदार, साधु चाफेकर, मदार शहा, शहर संतसंग प्रमुख किरण शालगर, संतोष वर्मा, कॅम्प प्रमुख पांडूरंग वैजवाडे, सुभाष जाधव, साळुंके, शुभम शालगर, अक्षय झिरमिरे, मानसिंग जमादार, रोहित वैजवाडे,आजी माजी पदाधिकारी, शहर सेवा केंद्र, तालुक्यातील विविध संतसंग कमेटीचे पदाधिकारी, भाविक भक्तगण यांनी मेहनत घेतली.यावेळी पहिले रक्तदान आमदार पवार केले आणि औसा विधानसभा मतदार संघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते , नागरिकांनी रक्तदान करण्याचे आवाहन आमदार साहेबांनी यावेळी केले.

## विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनातून यशाचा मंत्र आत्मसात करावा – मंत्री गुलाबराव पाटील

जळगाव ( जिमाका ): विज्ञान प्रदर्शन ही केवळ स्पर्धा नाही, तर तो आपल्या प्रयोगशीलतेला नवे आयाम देणारा एक मंच आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना दिशा देणारे आणि



विद्यार्थ्यांच्या कल्पकतेस चालना देण्यासाठी उत्तम व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रयोगशील विचारसरणी अंगीकारावी, जे जमते त्यावर अधिक भर द्यावा. विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करून आपल्या कल्पनांना कृतीत उतरवून विज्ञान प्रदर्शनातून यशाचा मंत्र आत्मसात करावा असे आवाहन पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. ते शहरातील सेंट टेरेसा विद्यालयात जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्यावतीने ५२ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आज मोठ्या थाटात करण्यात त्याप्रसंगी बोलत होते. मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन पार पडले.

कार्यक्रमाच्या सुरुवातील मान्यवरांनी श्री सरस्वती पूजन , दीपप्रज्वलन करून व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर केले, तर विविध शालेय खेळ व प्रयोगात्मक प्रात्यक्षिके सादर केली. करत विद्यार्थ्यांनी विज्ञानाची गोडी उपस्थितांना चाखवली. विद्यार्थ्यांच्या या सर्जनशीलतेला उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.

मंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले की, जिल्हा स्तरीय प्रदर्शन हे सुरुवातमानून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमक दाखवून आपल्या पालकांचे, शाळेचे आणि जिल्ह्याचे नाव उज्वल करावे. जिल्हा परिषद शिक्षकांनी ड्रेस कोडचा वापर करण्याचे आवाहन केले. खुद पर भरोसा रखो, हर मुश्किल आसान होगी, आज जो मेहनत करोगे, कल वही पहचान होगी। या शेर शायरी ने मंत्री गुलाबराव पाटील यांनी सुरुवात केलीं.

यावेळी आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी सांगितले की, मोबाईलचा वापर केवळ गरजेसाठीच करावा. त्यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलला मित्र मानण्याऐवजी आपले खरे मित्र म्हणजे शिक्षक आणि पालक असल्याचे पटवून दिले. विद्यार्थ्यांनीं आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आपले शिक्षण आणि व्यक्तिमत्वविकास साधावा, पण मोबाईलचा अतिवापर मात्र टाळावा. आई–वडील यांची सेवा करा. आपल्या जीवनाचा तेच खरा आधार असून, त्यांच्यासोबतचा स्नेह आणि संवादच आपल्याला खऱ्या यशाकडे घेऊन जाईल.

यावेळी डायटचे प्राचार्य अनिल झोपे, जिल्हा परिषद जळगावचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कल्पना चव्हाण, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विकास पाटील, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) सचिन परदेशी, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) ई. आर. शेख, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) रागिणी चव्हाण, गट विकास अधिकारी सरला पाटील, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) एन. एफ. चौधरी, जिल्हा शिक्षक सेनेचे नरेंद्र सपकाळे, रविंद्र चव्हाण सर, ज्ञानेश्र्वर सोनवणे, गट शिक्षणाधिकारी किशोर वायकोळे, शिक्षण विस्तार अधिकारी बी. डी. धाडी, जळगाव जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळचे अध्यक्ष किशोर राजे, सचिव सुनील वानखेडे, उपाध्यक्ष एस. डी. पाटील, सेंट टेरेसा कॉन्व्हेंट इंग्लिश मिडीयम हायर सेकंडरी स्कुलच्या मुख्याध्यापिका सिस्टर जुलीट, शालेय व्यवस्थापन समिती व कर्मचारी, जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व विद्यालयातील मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका, (पान ४ वर)

## सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २० ते २२ जानेवारीदरम्यान वर्धा येथे भक्ती महोत्सवाचे आयोजन

मुंबई : सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राज्यातील लोककला, लोकपरंपरा व भक्ती परपंरा चे जतन व संवर्धन व्हावे तसेच नवीन पिढीला आपल्या उच्च संस्कृतीची व परंपरेची ओळख नव माध्यमातून व्हावी, या उद्देशाने माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या कल्पनेतून व मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली भक्ती संप्रदायावर आधारित भक्ती महोत्सव या तीन दिवसीय कार्यक्रमाचे वर्धा येथे आयोजन करण्यात येत आहे.



सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने राज्यभरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम व नाविन्यपूर्ण उपक्रमाचे तसेच सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या लोककला, नाट्य, आदिवासी कला महोत्सवांचे आयोजन करण्यात येत आहे.

कीर्तन हे ग्रामीण भागातील रसिक प्रेक्षकांचे आजही प्रबोधन व भक्तीचे माध्यम आहे. भक्ती संस्कृतीचा विचार नवमाध्यमातून तरुण पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे दरवर्षी कीर्तन–भक्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी भक्ती महोत्सव दिनांक २० ते २२ जानेवारी २०२५ या कालावधीत वर्धा येथील सभागृह, सार्वजनिक वाचनालय मगणवाडी येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

मृदंग, टाळ आणि पेटीच्या साथीने सादर होणारे भजन, अभंग ही महाराष्ट्राची ओळख आहे. पारंपरिक लोकगीते, भजन आणि अभंग मौखिक स्वरुपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत आले आहेत. सामाजिक जडणघडणीमध्ये या त्यांचा मोठा वाटा आहे. वर्धा येथे आयोजित भक्ती महोत्सवाचे उदघाट्न सोमवार, २० जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. या महोत्सवात ह.भ.प. आचार्य महंत श्री बाभुळगावकर बाबा शास्त्री, करमाड (संभाजीनगर), ह.भ.प श्रीमती ज्योती जाधव, सिंदखेड राजा जि.बुलडाणा यांच कीर्तन सादर होईल. तर मंगळवार २१ जानेवारी २०२५ रोजी ह.भ.प. प्रा.गणेश महाराज भगत आळंदी, (पुणे) व ह.भ.प. प्रसन्ना शास्त्री रिद्धपूर, अमरावती यांचं कीर्तन सादर होईल. या भक्ती महोत्सवाचा समरोप बुधवार २२ जानेवारी २०२५ रोजी होणार असून बुधवारी ह.भ.प. श्री मयुरजी महाराज, विश्र्वशांती धाम येळाकेळी, वर्धा, ह.भ.प.श्री प्रकाश महाराज भगत वाघ श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम, ह. मु. वर्धा यांच व कीर्तनकार व प्रवचनकर श्रीमती प्राची गडकरी, मुंबई कीर्तन सादर होईल.

भक्ती महोत्सव या कार्यक्रमात सर्व मान्यवर कीर्तनकार, प्रवचनकार यांची भक्तीमय वाणी ऐकण्यासाठी वर्धा भागातील रसिकांनी उस्फूर्तपणे यावे हा कार्यक्रम सर्व–रसिक प्रेक्षकांना विनामूल्य उपलब्ध असून जास्तीत जास्त रसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## ‘आर्टी’च्या प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

मुंबई, : मातंग आणि तत्सम जातींच्या उन्नतीकरीता विविध कौशल्य विकास प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, विविध योजना राबविण्यात येत आहे. उमेदवारांनी आपल्या आवडीनुसार स्पर्धा परीक्षा, कौशल्य प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करावी, असे आवाहन ‘आर्टी’चे व्यवस्थापकीय संचालक सुनिल वारे यांनी केले आहे. ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत ३१ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. युवकांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात अर्ज केल्यामुळे तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. त्यावर तांत्रिक विभागाने गुगल फार्म ऐवजी ‘आर्टी’च्या संकेतस्थळावर उमेदवारांना नोंदणीसाठी नवीन अर्ज उपलब्ध करुन दिला आहे. उमेदवारांनी याठिकाणी नोंदणी केल्यानंतर कौशल्य प्रशिक्षणानुसार त्यांच्या अर्जाची छाननी करुन त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कौशल्य प्रशिक्षण पुर्ण करणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे. जे उमेदवार स्वंयरोजगारासाठी इच्छुक आहेत, त्यांच्या व्यवसायाकरिता आर्थिक मदत करण्यात येणार आहे. ऑनलाईन अर्ज नोंदणी सुरु असल्याची माहिती श्री. वारे यांनी दिली. स्पर्धा परीक्षा: एमपीएससी, युपीएससी, बँक (आयबीपीएस), रेल्वे, जेईई- नीट, युजीसी-नेट/ सेट, पोलीस/मिलीटरी. कौशल्य विकास: परदेशात नोकरीसाठी लागणारे विविध कौशल्य प्रशिक्षण व परदेशी उच्च शिक्षणाची संधी, शेतीपूरक विविध व्यवसाय प्रशिक्षण, हार्डवेअर व सॉफ्टवेअर, तसेच कॉम्प्युटर सर्टिफिकेट संदर्भातील विविध कोर्सेसचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. योजना: पीएच. डी, पोस्ट पीएच. डी संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) नोंदणी कशी करावी

इच्छुक उमेदवारांनी https://arti.org.in या आर्टीच्या संकेतस्थळावर करिअर हा पर्याय निवडावा आणि ऑनलाईन नोंदणी करावी. किंवा पुढील लिंकवर क्लिक करुन https://arti.org.in/arti-क्षेल ऑनलाईन अर्ज करावा.

# कवडीत ही जातीभेद...?

## संपादकीय...

कवडीची माळ तुळजाभवानी, अंबादेवीची साधू-संतांची, दररोज जोगवा मागणाऱ्या आराधी महिलांची, देवीभक्त पुरुषांची, तृतीयपंथीयांचीच हा अनुभव सत्यताही महाराष्ट्र तमाम भारतीय जनतेत रुजलेली आहे, हे वास्तव नाकारता येत नाही. पण याच कवडीतही जातिभेद असल्याची परंपरागत हरित अंधश्रद्धा काही रूढ घट होत गेली, हे सहजच होऊन बसल्याने ही कवडीच कवडीमोल कशी होऊन बसली हेच कळत नाही. म्हणून कवडी बद्दल लिहिण्याचा हा प्रपंच दैनिक लातूर प्रभातच्या अग्रलेखातून करणे क्रम प्राप्त ठरते.

कधीकाळी कवडी हे दक्षिण आफ्रिकेतील चलन होते, दक्षिण आफ्रिका म्हणजे अस्पृश्य निग्रो काळ्या लोकांचे राज्य, फिडेल केस्ट्रो, नेल्सन मंडेला हे त्या राज्याचे देशाचे प्रधान मंत्री म्हणून सत्ता भोगलेले असले तरी, आज घडीला हे कवडी तिची प्रेरणा त्यामागील भावना या कवडीमोल झाल्या असल्या तरी त्या कवडीमधला मतितार्थ मात्र आजही ताजा तवांना वाटतं पण लक्षात कोण घेतो हेच अवघड होऊन बसल्याचे दिसते आहे, हे नाकारता येत नाही.

कवडीला अनन्य साधारण महत्त्व आहे कारण लक्ष्मी घरात असते, पैशातही ती दिसते अर्थकारणात तर ती असतेच असते, घराघरात ती स्त्रीमध्ये दिसते, म्हणून लक्ष्मीपूजना दिवशी संपत्ती पैशाबरोबर एका मुखवट्यातील स्त्रीला लक्ष्मीला बसून घरातील सुनेला ओवाळले जाते ती पुन्हा सासू होते, पण स्त्रीमध्ये महिलेच्या संदर्भातील जी प्रारूपे आहेत ती त्या, त्या प्रत्येक महिलेत असतातच म्हणूनच कवडीला स्त्रीचे स्त्री शक्तीचे सुफलतेचे प्रतीक मानले जाते, त्यात संदेह नसावा.

कवडी हे स्त्रीशक्तीचे सुफलनाचे प्रतीक असले तरी आपल्याकडे आज घडीला डिजिटल व्यवहारामुळे जसे चिल्लर बँकेत पडून राहते त्याचा टाकसाळीतून काळाबाजार होतो तसेच देवाच्या दारातील, गळ्यातील कवडीचे झाले असेल तर त्या संदर्भान्वये काहीच तर्क वितर्क काढण्यापेक्षा या कवडीचा पसारा कसा पसरला आहे, तीच बाब चिंतेचे वाटते म्हणूनच कवडीतही जातीभेद कसा हा प्रश्न आधुनिक भारतात विशेषता महाराष्ट्रात भेडसावणारा दिसतो आहे म्हणून या कवडी मोलाची चिकित्सा करणे गरजेचे वाटते यासाठीचा हा महत्त्वाचा वाटतो अशीच प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.

धर्म म्हणजे पारलौकिक कल्याण आणि नितीमुल्यांचा पुरस्कार असे होत नाही. त्यात विषमता ही असते ती दूर करण्यासाठी एखादी रूढ बाजूला केली तर धर्म सुधारणा होते असे नाही. तसेच कवडीचे होत असेल, झाले असेल, म्हणूनच धर्म रुढीपरंपरेबद्दल प्रा. नरहर कुरुंदकरांनी तसा प्रश्न केला होता. तसे धाडस कोणात आहे, हिंदू मनुच्या सनातनी कृतीवरून डॉ. शरण कुमार लिंबाळे यांनी सनातन मधून भीमा कोरेगावची शौर्यगाथा लिहिली पण सनातनात हा शब्द हिंदू मनुवादी म्हणून सनातन न वाचताच दलित आंबेडकरवादी म्हणून घेणाऱ्या विचारवंताने निषेध केला पण हीच कवडी, लक्ष्मी सावंत नावाच्या महिलेने तुळजापूरच्या तुळजाभवानी अंबादेवीच्या गळ्यात घातली तीच कवडी माळ तुळजापूरच्या बाजारात ठेवली आणि तीच कवडी माळ तुळजाभवानीची कवडी माळ येडाई येमाई मातंगीची कवडी माळ म्हणून आजही समाज मनात रुजली असली तरी तुळजाभवानीची यात्रा येडाईचा खेटा अशी विषमतावादी शब्दरचना असेल तर कवडीचे चलन आणि कवडीचे मोल यातूनच स्त्रीशक्तीचे मोल काय ते शोधावे लागेल हे प्रसारमाध्यमानेच ठरवावे.

# आपण पालक तर कमी पडत नाहीयोत ना...

लातूर :आपल्या जीवनात वाचनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास तर होतोच सोबतच आपले जीवन देखील समृद्ध होते. सध्या गल्ली ते दिल्ली जिथे कुठे पाच-दहा लोकं एकत्र येतात तेव्हा, तिथे सुरू होते चर्चा. अगदी गल्लीतील व्यक्तीपासून ते थेट डोनाल्ड ट्रम्प पर्यंत ती चर्चा जावून पोहोचते. कोणत्याही चर्चेला सामोरे जात असताना केवळ तर्क वितर्क लढवण्यात काहीजण माहीर असतात मात्र एखादाच असतो जो मुद्द्याला धरून चर्चा करत असतो. तेव्हा आपण त्याला उद्देशून म्हणतो याचा अभ्यास जोरात दिसतो, बहुतेक याला वाचण्याची आवड आहे. पुस्तके वाचणारा व्यक्ती कधीही कुठेही अगदी सहजपणे आपली वेगळी छाप पाडून जातो. एवढं महत्त्व वाचनाचे आपल्या जीवनात आहे.




आपला खरा मित्र कोण असेल तर तो म्हणजे पुस्तक होय, पुस्तकांशिवाय दुसरा मित्र असू शकत नाही. कुठेही कधीही तो आपल्या सोबत असतो. पूर्वीच्या काळी मनोरंजनाची फारशी साधनं नसल्याने साहजिकच पुस्तक वाचनाकडे अनेकांचा कल असायचा. जसजशी मनोरंजनाची साधने वाढत गेली तस- तशी पुस्तकां पासून लोक दूर होत गेली व अभासी दुनियेत अडकून बसली.आज पुस्तके वाचणाऱ्यांची संख्या म्हणावी तेवढी नाही. ही खेदाची बाब आहे.

लोप पावलेली चाललेली वाचन संस्कृती जोपासली जावी असे प्रत्येकाला वाटते. अशा वेळी 'रीड लातूर' उपक्रमाची सुरुवात लातूर मध्ये झाली. लहानपणा पासूनच पुस्तके वाचनाची आवड असणाऱ्या

सौ.दीपशिखाताई धिरज देशमुख यांना 'रीड लातूर' उपक्रम सुरू करावा असे वाटले. हा विचार त्यांनी धिरज देशमुख यांच्याकडे बोलून दाखवला त्यानंतर गृह मंत्र्यांच्या विचाराला चालना देण्याचा निर्णय घेऊन प्रत्यक्षात ६ एप्रिल २०२२ रोजी रीडलातूरची सुरुवात करण्यात आली. याची सुरुवात करत असताना लहान मुलांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले. याचे कारण म्हणजे लहान मुले हे कोऱ्या पाटी सारखे असतात त्यावर जे काही आपण लिहतो ते कायम राहते. बालवयातच जर पुस्तके वाचणाची आवड त्यांच्या मनात निर्माण झाली तर ती आवड कायम राहते.

म्हणुनच जवळपास १५० जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना रीड लातूर उपक्रमांतर्गत जगभरातील नामांकित लेखकांची पुस्तके दीपशिखाताई व धिरज देशमुख यांनी उपलब्ध करून दिली आहेत. या पुस्तकांचे विद्यार्थि नियमितपणे वाचन करत आहेत. शालेय अभ्यासक्रमाची पुस्तके सोडली तर अवांतर वाचनाची पुस्तके विद्यार्थ्यांकडे उपलब्ध नसतात त्यामुळे साहसीकथा, काल्पनिक, अकाल्पनिक कथा, कविता, जीवन चरित्र अशा विविध साहित्य प्रकाराची इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेतील पुस्तके विद्यार्थ्यांना वाचायला मिळत असल्याने ते खूप आनंदी झाले आहेत.

नुकतेच लातूर येथे मराठवाड्यातील पहिले शैक्षणिक महासंमेलन पार पडले. लातूर हे शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखले जात असताना आपण कुठे होतो, कुठे आलो आहोत व कुठपर्यंत आपणास पोहोंचायचे आहे. याचा विचार व्हावा यासाठी एक शैक्षणिक महासंमेलन लातूर मध्ये आयोजित करावे असे डॉ.ओम प्रकाश झुरूळे, विवेक सावताडेकर व त्यांच्या सहकाऱ्यांना वाटले हा विचार घेऊन त्यांनी जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्याशी संपर्क साधून सर्व रूपरेषा त्यांच्यापुढे मांडली. क्षणाचा देखील विलंब न लावता यासाठी जे काही सहकार्य हवे आहे ते देण्याचे त्यांनी जाहीर केले व प्रत्यक्षात १०,११ व १२ जानेवारी २०२५ या कालावधीत शैक्षणिक महासंमेलन पार पडले. अनेक नामवंत विषय तज्ञांनी यामध्ये बहुमोल असे विचार व्यक्त केले. शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित हे तीन दिवसीय महासंमेलन असल्याने रीड लातूरची माहिती व वाचनाविषयी प्रेरणा मिळावी यासाठी एक दालन रीड लातुर करून उभारण्यात आले होते.

सर्वदालनांपैकी जी काही मोजकी दालनं तिथे येणाऱ्या व्यक्तींना आकर्षित करत होती. त्यापैकी रीड लातूर हे एक दालन सर्वांच्या आवडीचे ठरले. महासंमेलनाचे वैशिष्ट्य हे देखील होते की, पालक आपल्या पाल्यांना सोबत घेऊन आले होते. आत प्रवेश केल्यानंतर डाव्या बाजूस रीड लातूर नावाचा बोर्ड सर्वांची लक्ष वेधून घेत होते. थोडं जवळ येऊन पाहिलं तर तिन्ही बाजूने असलेले छायाचित्र व मधोमध असलेली पुस्तके सर्वांना आकर्षित करत होती. त्यामुळे साहजिकच ते पुस्तके नेमकी कशाची आहेत हे पाहण्यासाठी सर्वांनी रीड लातूर दालनास आवर्जून भेट दिली. तिथे असलेली पुस्तके खूप आकर्षक असल्याने मुलं ती पुस्तके हातात घेऊन आनंदाने वाचत होती.मुलं पुस्तके वाचण्यात दंग झाल्याने पालकांना उशीर होत होता. पुढे आणखीन खूप स्टॉल असल्याने तिथे जाण्यासाठी पालक घाई करत होते.मात्र मुलं काही पुस्तके सोडण्यासाठी तयार नव्हती. असा प्रसंग अनेक पालकांच्या बाबतीत घडत होता. यावरून एक गोष्ट नक्की समजली की, लहान मुलांना पुस्तके वाचनाची आवड अगदी मनापासून आहे. आपण सहजपणे म्हणतो की मुलांना मोबाईल चे खूप वेड लागले आहे. मात्र ते पूर्ण सत्य नाही. आपण त्यांना मोबाईल कडे पाठवत आहोत जर मुलांना त्यांच्या आवडीची पुस्तके उपलब्ध करून दिली तर ते पुस्तकांशी अगदी सहजपणे मैत्री करतील.पुस्तकांसारखा एखादा मित्र लहान मुलांच्या जीवनात आला तर निश्चितच त्याचे सकारात्मक बदल दिसू लागतील व एक सक्षम व समृद्ध अशी नवी पिढी निर्माण होईल यात कसलीही शंका नाही.

त्यामुळे मुलांना पुस्तके देण्यात आपण तर कमी पडतनाहीयोत ना असा प्रश्न या निमित्ताने निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकास स्वतःच द्यावे लागणार आहे असे मला वाटते.

मुलांना पुस्तकांची गोडी लागावी यासाठी रीड लातूर करत असलेले कार्य खूप मोलाचे ठरत आहे. धिरज विलासराव देशमुख व दीपशिखाताई धिरज देशमुख यांच्या विचाराला शिक्षक मंडळींची साथ मिळत असल्याने रीड लातूरच्या माध्यमातून एक सकारात्मक बदल समाजात घडून येत आहे. मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनातील रीड लातूरच्या दालनास अनेकांनी भेटी देऊन या उपक्रमाचे कौतुक केले व आपणास देखील वाचनासाठी पुस्तके मिळावीत अशी विनंती केली. यासोबतच वाचून झालेली पुस्तके आम्ही तुम्हाला देऊ इच्छित आहोत असे देखील अनेकांनी सांगितले. लातूरची ओळख आता वाचणारे लातूर अशी अधोरेखित होत आहे. हा देखील एक लातूर पॅटर्नच म्हणावा लागेल.

## चारचाकी गाड्याना थांबवून प्रवाशांना धमकावून जबरदस्तीने सोन्याचे दागिने चोरणाऱ्या तीन आरोपीतांकडून ६ लाख ७६ हजार रुपयांचे ९.४ तोळे सोन्याचे दागिनेसह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :याबाबत थोडक्यात माहिती की, विश्लेषण करून मोटरसायकल वर येऊन




काही दिवसा पूर्वी पोलीस ठाणे रेणापूर हद्दीमध्ये लातूर ते रेणापूर रोड जाणारे रोड वरील बोरवटी गावा जवळ अज्ञात आरोपींनी कार मधून जाणारे दांपत्याना अडवून त्यांना धमकी व धाक दाखवून जबरदस्तीने त्यांच्याकडील सोन्याचे दागिने चोरून नेहल्याचे दोन घटना घडल्या होत्या. त्यावरून पोलीस ठाणे रेणापूर येथे कलम ३०९(४), ३५१(२), ३५१(३), ३(५) भारतीय न्याय संहिता व ३९२, ३२ भादवी प्रमाणे २ गुन्हे दाखल झाले होते.

सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथक तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या. सदर पथका कडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्र्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून मोटरसायकल वर येऊन कार चालकांना अडवून त्यांना धमकी, धाक दाखवून, जबरीने सोन्या-चांदीचे दागिने लुटणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.

सदर माहितीची बारकाईने अभ्यास व सदरचे गुन्हे करणाऱ्या आरोपीना निष्पन्न करून, सदर आरोपींना दिनांक १७/०१/२०२५ रोजी त्यांच्या राहते ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर पथकांनी अतिशय कुशलतेने व उत्कृष्टपणे नमूद गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेऊन नमूद आरोपीला गुन्ह्यात चोरलेले सोन्याचे ९.४ तोळे वजनाचे ०६ लाख ७६ हजार रुपयाचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

१) अमोल सुभाष राठोड, वय २७ वर्ष, राहणार नेहरूनगर तांडा तालुका रेणापूर.

२) अभय उर्फ राहुल संतोष चव्हाण, वय २१ वर्ष, राहणार नेहरूनगर तांडा तालुका रेणापूर.

३) कृष्णा राजूभाऊ ढमाले, वय २५ वर्ष, राहणार बोरवटी तालुका जिल्हा लातूर.

यांना ताब्यात घेवुन मुद्देमाल जप्त करून नमूद गुन्ह्यात अटक करणे कामी पोलीस ठाणे रेणापूर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाईत पोलीस ठाणे रेणापूर लातूर येथील २ जबरी चोरीचे गुन्हे उघड झाले असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे रेणापूर चे पोलीस अधिकारी अमलदार करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्र्वंभर पल्लेवाड नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार सूर्यकांत कलमे, योगेश गायकवाड, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, प्रदीप चोपणे यांनी केली आहे.

# छगन भुजबळ नक्की अधिवेशनात सहभागी होतील सुनिल तटकरे यांची माहिती

शिर्डी:दिशा विकासाची पुरोगामी विचाराची हे ब्रीद वाक्य घेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे साईनगरीत दोन दिवस नवसंकल्प शिबीर होत आहे. विधानसभेतील अभूतपूर्व यशानंतर आता पुढील वर्षात तसंच आगामी पाच वर्षात पक्ष संघटन मजबूत करणे, पक्षात शिस्त आणणे, नवे संकल्प निश्चित करणे आणि त्या संदर्भात पक्षाचे, विकासाचे धोरण ठरवण्यासाठी या शिबिरात विचारमंथन करण्यात येइल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी दिली.

पक्षाचा नवसंकल्प - शिर्डीत १८ व १९ जानेवारी रोजी होणाऱ्या पक्षाच्या नवसंकल्प शिबिराच्या पूर्व संध्येला तटकरे यांनी पत्रकार परिषदेत अधिवेशनाबाबतची भूमिका विषद केली. यावेळी रुपाली चाकणकर, आनंद परांजपे, संग्राम कोते, कपील पवार, दीपक गोंदकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या अधिवेशनासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, प्रफुल पटेल, दिलीप वळसे पाटील, मंत्री धनंजय मुंडे, आजी माजी आमदार, खासदार, सर्व सेलचे प्रदेशाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.ही तर पक्षांतर्गत बाब - छगन भुजबळ यांच्या नाराजीबाबत विचारले असता तटकरे म्हणाले, भुजबळ पक्षाचे ज्येष्ठ नेते, संस्थापक अध्यक्ष आहेत. पक्षाच्या जडणघडणीत त्यांचा वाटा आहे. त्यांना मी व्यक्तीश: विनंती केलेली आहे. ते नक्की अधिवेशनात सहभागी होतील. त्यांच्या मंत्रिपदाबाबचा विषय ही पक्षांतर्गत बाब असल्याचं ते म्हणाले.

सदस्य नोंदणी अभियान - पक्षाचा जनाधार वाढवण्यासाठी राज्यभरात एका ठराविक कालावधीत सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाची सुरुवात अधिवेशनातून करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका पार पडतील. या निवडणुकांबरोबरच कृषी धोरण, वातावरणीय बदल आदीबाबतही चर्चा होईल. विविध राजकीय विकांनाही या अधिवेशनात व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आलं आहे. पक्ष बॅकफुटवर - बीड प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितला जात आहे. त्यांच्यामुळे पक्ष बॅकफुटवर आला का, यावर त्यांनी बीडची घटना गंभीर आहे. या प्रकरणाचा तपास सुरू आहे. याचा मास्टरमाईंड शोधला जाईल, पोलिसांकडून या प्रकरणाची उकल करण्याचं काम सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. पालकमंत्री नियुक्ती येत्या एकदोन दिवसांत होवू शकते. तिन्ही पक्ष एकत्रित बसून त्यावर निर्णय घेतली. ही बाब सरकारशी निगडीत आहे. त्यामुळे त्यावर अधिक बोलणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

पक्षाचे मागचे अधिवेशन शिर्डीत झाले, त्यावेळी शरद पवार आणि अजित पवार दोघेही एकत्रित होते. त्याच शिर्डीत आता अधिवेशन घेताना काय वाटते यावर ते म्हणाले, ९९ पासूनच्या आठवणी आहेत, पण पक्षात कृतीला, विचाराला महत्व असते. भाजपाबरोबर जाण्यासाठी आमचा २०१४ पासून प्रयत्न होता. राज्यातील कायदा सुव्यवस्थेबाबत आरोप करणारे महाविकास आघाडीचे नेते अद्याप विधानसभेच्या पराभवाच्या नैराश्येतून बाहेर पडलेले नसल्याची टीका तटकरे यांनी केली.

## संतोष देशमुख प्रकरणातील सर्व आरोपींना व्हिसीद्वारे कोर्टात करणार हजर

बीड :बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने राज्याचे वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणातील सहा आरोपींची आज एसआयटी कोठडी संपणार असून सर्व आरोपींना आज बीड येथील जिल्हा न्यायालयात व्हिसीद्वारे हजर केले जाणार आहे. न्यायालयाच्या सुनावणीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेले सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि हत्येच्या दिवशी आरोपीला संतोष देशमुख यांचे लोकेशन सांगणारा सिद्धार्थ सोनवणे या तिघांची १४ दिवसांची पोलीस कोठडी आज संपत आहे. तसेच प्रतिक घुले, महेश केदार, जयराम चाटे यांची देखील १२ दिवसाची पोलीस कोठडी संपत असल्याने सर्व आरोपींना आज व्हिसीद्वारे कोर्टात हजर केले जाणार आहे. सर्व आरोपींना बीड जिल्ह्यात वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातल्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव एसआयटीकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे तलवाडा पोलीस स्टेशनमधून दोन आरोपी, गेवराई पोलीस स्टेशनमधून दोन आरोपी तर माजलगाव पोलीस स्टेशनमधून दोन आरोपींना व्हिसीद्वारे कोर्टात हजर केले जाणार आहे. आजच्या सुनावणीत न्यायालय काय निर्णय देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यात मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडवर मकोका दाखल करण्यात आला आहे. वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# प्रजापिता ब्रह्मकुमारी इश्र्वरीय संस्थेचे संस्थापक ब्रहमाबाबा यांचा ५६ वा स्मृतीदिन आणि विश्र्व शांती दिवस साजरा

लातूर : प्रजापिता ब्रहमकुमारी इश्र्वरीय संस्थेचे संस्थापक ब्रहमाबाबा यांचा ५६ वा स्मृतीदिन आणि विश्र्व शांती दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून प्रजापती ब्रम्हाकुमारी ईश्र्वरीय विश्र्वविद्यालयच्या मुख्यसंचालिका ब्रम्हाकुमारी नंदा दिदी, उपसंचालिका पुण्या यांचे आध्यात्मिक मार्गदर्शन ऐकले.



प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्र्वरीय संस्थेचे संस्थापक ब्रह्माबाबा यांचा स्मृतिदिन आणि विश्र्व शांती दिवस शनीवार दि. १८ जानेवारी रोजी राजयोग केंद्र, जुना औसा रोड, लातूर येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या कार्यक्रमात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचे प्रजापती ब्रम्हाकुमारी ईश्र्वरीय विश्र्वविद्यालयच्या मुख्यसंचालिका ब्रम्हाकुमारी नंदा दिदी, उपसंचालिका पुण्या दिदी यांनी स्वागत केले.

यावेळी व्यासपीठावर ब्रम्हाकुमारी नंदा दिदी, उपसंचालिका पुण्या दिदी, सौ. प्रतिभा पाटील कव्हेकर, डॉ. सारीका देशमुख, भुवनेश्र्वर महाराज, राजेंद्रप्रसाद माने आदीची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलतांना ब्रहमकुमारी नंदा बहेन म्हणाल्या प्रत्येक मानावातून देवमानव तयार झाला पाहीजे, श्रेष्ठ आणि आदर्श जीवन तयार करण्यासाठी सर्वशक्तीमान शक्तीशी आपण जोडलो गेलो पाहिजे. आपण कोण आहोत आणि आपला काय परीचय आहे, हे ओळखण्यासाठी अध्यात्मिक शक्तीच अनुकरण करायला हव. चांगले जीवन आणि चांगला मनुष्य होण्यासाठी आपल संचलन करणारी शक्ती ओळखयला हवी. आज देखील चांगले आईवडील असतील तर चांगली मुले निर्माण होतील म्हणून स्त्री घडणे महत्वाचे आहे असे सांगून त्या म्हणाल्या, प्रजापिता ब्रहमकुमारी इश्र्वरीय संस्थेचे संस्थापक ब्रहमाबाबा यांनी देशातील स्त्रीशक्ती जागृत करुन त्यांना भव्य कार्य करण्यासाठी प्रेरीत केले असे सांगीतले.

यावेळी बोलतांना विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी ब्रह्मकुमारी संस्थेच्या कामाचे कौतुक केले आणि म्हणाल्या, लातुर येथील प्रजापिता ब्रहमकुमारी इश्र्वरीय संस्था राजयोग केंद्राच्या माध्यमतून येथे चांगले कार्य होत आहे. ब्रहमकुमारी नंदा बहेन, पूण्या बहेन आणि त्यांचे सहकारी निस्वार्स्थीपणे समाजकार्य करीत आहेत. त्यांच्या सानिध्यात राहून अध्यात्मिक मार्गदशर्न घेऊन आपणही आपले जीवन घडवावे. आज स्त्री हा महत्वाचा घटक आहे, कारण एक स्त्री स्वताची मुल घडवून घर घडवते आणि घर घडवून समाज घडविण्यासाठी मदत करते असे यावेळी बोलतांना सांगीतले. यावेळी सौ. प्रतिभा पाटील कव्हेकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

# मालमत्ता कर दात्यांसाठी प्रोत्सानपर बक्षीस योजना

लातूर/प्रतिनिधी : कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्ष्याच्या सुरुवातीपासूनच मालमत्ता धारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आल्या होती . त्यानंतर लातूरकराना एक अनोखी भेट म्हणून दिं.२० जानेवारी २०२५ ते दिं. १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत थकबाकीसह चालू अर्थिक वर्षातील संपूर्ण कराचा एक रक्कमी भरणा करणा–या करदात्यास लातूर शहर महानगरपालिकेमार्फत प्रोत्सानपर बक्षीस योजना राबवण्यात येणार असून, विजेत्यांची नावे ऑनलाइन पधतीने निवडण्यात येणार आहेत. योजनेच्या कालावधीतील टॅक्स भरणा पावती ही सहभाग असल्याचे नोंद होईल . तरी वरील मुदतीत कर भरणा करणा–या कर दात्यास मालमत्ता कर श्रेणीनुसार खालील प्रमाणे प्रोत्सानपर बक्षीस देण्यात येणार आहे.

कर गुप्र रु.१ ते ५००० करिता बक्षीस वस्तू १५ (मिक्सर),

कर गुप्र रु. ५००१ ते १०००० करिता बक्षीस वस्तू १० (कुलर)

कर गुप्र रु. १०००१ ते २५००० करिता बक्षीस वस्तू ५ (फ्रिज)

कर गुप्र रु. २५००१ ते १००००० करिता बक्षीस वस्तू २ (कलर टि.व्हि)

कर गुप्र रु. १००००० वरील सर्व, वस्तू १ (स्कूटी बाईक)

वरील प्रमाणे प्रोत्सानपर बक्षीस योजनासाठी वस्तू ठेवण्यात आल्या असून विजेत्यांची निवड १३ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे .तरी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी मालमत्ताधारकांनी वरील देण्यात आलेल्या मुदतीमध्ये कर भरणा करून योजनेत सहभाग नोंदवुन आपल्याकडील देय असलेल्या कराचा भरणा करावा व बक्षीस जिंकावे असे आव्हान आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यात एकाच दिवशी ३० गावांमध्ये स्वामित्व सनद वितरण

लातूर, : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ई–वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या



हस्ते स्वामित्व योजनेतंर्गत देशातील ५० हजार गावांमधील मालमत्ताधारकांना स्वामित्व सनदचे ई–वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे थेट प्रसारण जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमामध्ये दाखविण्यात आले. यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते मोगरगा गावातील मालमत्ताधारकांना प्रातिनिधिक स्वरुपात मालमत्ता पत्रक व सनद वितरीत करण्यात आल्या. तसेच जिल्ह्यात एकाच दिवशी ३० गावांमधील ८ हजार ५११ लाभार्थ्यांना सनद वितरीत करण्यात आली.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख एन.एन. पटेल, उपअधीक्षक वैशाली गवई, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब वाघ यांच्यासह नागरिक यावेळी उपस्थित होते.

गावठाणातील जमिनींचे जीआयएसद्वारे सर्वेक्षण व भूमापन करून मिळकतधारकांना स्वामित्व सनद वितरीत करण्यासाठी स्वामित्व योजना हाती घेण्यात आली आहे. यासाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि प्रगत नकाशांकन तंत्राचा उपयोग केला जात आहे. या योजनेंतर्गत तयार करण्यात झालेल्या स्वामित्व सनदचे हस्ते आज झाले. यावेळी त्यांनी देशातील काही लाभार्थ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधून या योजनेमुळे त्यांना झालेल्या लाभाची माहिती घेतली. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमाला उपस्थितांना संबोधित केले.

स्वामित्व योजनेतून गावठाणातील सर्व मिळकतींचे आधुनिक ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण करून प्रत्येक मिळकतीचे स्वामित्व सनद तयार करण्यात आली आहे. मिळकतीचा नकाशाही या सनदीमध्ये देण्यात आला असल्याने प्रत्येक मिळकतधारकाला आपल्या मिळकतीच्या सीमांची अचूक माहिती मिळणार आहे. त्यामुळे मालकी हक्क, मिळकतीच्या हद्दीमुळे होणारे वाद थांबतील, असा विश्र्वास आमदार श्री. पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

स्वामित्व योजनेतंर्गत लातूर जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ५०२ गावांतील ६९ हजार ३०४ मिळकतींच्या स्वामित्व सनद प्राप्त झाल्या आहेत. २३३ गावांमधील २२ हजार ६६१ मालमत्ताधारकांना सनद वाटप पूर्ण झाले आहे. तसेच आज एकाच दिवशी ३० गावांमधील ८ हजार ५११ लाभार्थ्यांना स्वामित्व सनद वाटप होत असल्याचे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख एन.एन. पटेल यांनी सांगितले.

# ट्रोसिटी कायद्याविषयी २२ जानेवारी रोजी तालुका, जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा

लातूर : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१६ या कायद्याविषयी तालुका व जिल्हास्तरीय एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा २२ जानेवारी २०२५ रोजी लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आली आहे. पुणे येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) व लातूर समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

२२ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० या कालावधीत होणाऱ्या या प्रशिक्षण कार्यशाळेस जिल्ह्यातील ट्रोसिटी प्रकरणांचे कामकाज पाहणारे जिल्हा सत्र न्यायालयातील जिल्हा सरकारी वकील, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सहायक पोलीस निरीक्षक (नाहसं), गट विकास अधिकारी आदी अधिकारी, कर्मचारी तसेच उपविभागीय दक्षता व नियंत्रण समितीमधील सर्व शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित राहण्याचे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी केले आहे. अधिक माहिती साठी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील समाज कल्याण निरीक्षक एन. डी. शिंदे (भ्रमणध्वनी क्र. ९६५७८२३०८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे त्यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्रात कायद्याचा धाक शिल्लक नाही–डॉ.हुलगेश चलवादी

पुणे:–पुरोगामी महाराष्ट्रात बहुजनांसह इतर नागरिक वाढत्या गुन्हेगारीमुळे भयभीत आहेत. गुंडशाहीला मिळणारा राजकीय आशीर्वाद यासाठी मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतोय. गेल्या काही काळात घडलेल्या घटनांवरून ते अधोरेखित होतंय,असा दावा बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्र्चिम महाराष्ट्र मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी शनिवारी (ता.१८) व्यक्त केला. राज्यात महायुती सरकारचे बहुमतातील सरकार सत्तेत येताच समाजा समाजात तेढ वाढण्यासह गुंडगिरीतही कमालीची वाढ झाली आहे. विशेष म्हणजे पोलीस प्रशासनाचा वचक नसल्यामुळे परभरणीतील सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलीस कोठडीतील मृत्यू असो अथवा मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड, सर्वच प्रकरणात राज्य सरकार 'बॅक फूट'वर आले असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

गुन्हेगारीच्या वाढत्या आलेखामुळे तो प्रस्थापित राजकीय पक्षांकडून पुरस्कृत तर नाही ना? असा सवाल देखील डॉ.चलवादींनी यानिमित्ताने उपस्थित केला.संतोष देशमुख प्रकरणात राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणात अनेक राजकीय आरोप–प्रत्यारोप करण्यात आले आहेत. गुन्हेगारांना मिळणाऱ्या राजाश्रयाचे हे जिवंत उदाहरण आहे.लॉरेन्स बिष्णोई सारखे गुंड कारागृहात बसून त्यांची टोळी चालवत आहेत.राज्यात सैफ अली खान,सलमान खान सारखे अभिनेते सुरक्षित नाहीत, तर सर्वसामान्यांची कल्पना करवत नाही.शिवाय कल्याणमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्यानंतर तिची हत्या करण्यात आल्याचा प्रकार पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारा आहे.

राज्यातील अनेक वस्त्या,भागांमध्ये गाव गुंड मोकाट आहेत. यंत्रणेच्या आशिर्वादाने सुरू असलेल्या अवैध धंद्यांमुळे नागरिक हैराण असल्याचा दावा डॉ.चलवादी यांनी केला. गुन्हेगारीचा बिमोड करण्याचा एकसुत्री कार्यक्रम गृहखात्याने राबवण्याची आवश्यकता आहे. वाढते गुन्हेगारीचे प्रमाण, काही भागांतील जातीय तणाव आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमुळे सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.मुंबई, पुणे आणि नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांत सायबर गुन्ह्यांत वाढ झाली असून ग्रामीण भागात जमिनीच्या वादांमुळे गुन्हेगारीची वाढ होतानाही दिसत आहे. सरकारने यासंबंधी किमान आता तरी योग्य पावले उचलावीत, अशी मागणी डॉ. चलवादी यांनी केली आहे.

# करीनाचा खळबळजनक जबाब! हल्ला चोरीच्या उद्देशाने नाही?

मुंबई :अभिनेता सैफ अली खानवर घरात घुसून प्राणघातक हल्ला करण्यात आल्याच्या घटनेला ४८ तासांहून अधिकचा कालावधी उलटूनही आरोपी मोकाट फिरतोय. सैफ अली खानवर लिलावती रुग्णालयात उपचार सुरु असतानाच या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलीस वेगवेगळ्या लोकांचा जबाब नोंदवत आहेत. याचदरम्यान सैफची पत्नी आणि अभिनेत्री करीना कपूरचा जबाब पोलिसांनी नोंदवला आहे. विशेष म्हणजे करीनाच्या जबाबामधून एक वेगळीच गोष्ट समोर आली असून प्राथमिक अंदाजानुसार चोरीच्या उद्देशाने हल्लेखोर सैफच्या घरात घुसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत होते. मात्र करीनाचा जबाब काहीतरी वेगळचे सूचित करतोय.

करीना म्हणाली, मी मुलांच्या खोलीच्या दिशेने धावली सैफवर झालेल्या हल्ला प्रकरणामध्ये पोलिसांनी आतापर्यंत ४० ते ५० जणांची चौकशी केली आहे. हल्ला झाला तेव्हा घरात असलेल्या कर्मचाऱ्यांपासून ते सैफला रुग्णालयात घेऊन गेलेल्या रिक्षाचालकापर्यंत अनेकांचा जबाब पोलिसांनी नोंदवला आहे. यामध्ये करीनाचाही समावेश असून तिने आपल्या जबाबामध्ये नेमके काय घडले हे सांगितले आहे. चोर घरात शिरल्याचे पाहिल्यानंतर नर्सने आरडाओरड केली त्यानंतर सैफ आणि मी मुलांच्या खोलीच्या दिशेने धाव घेतली, असे करीनाने पोलिसांना सांगितले. त्या व्यक्तीला जहांगीरवर हल्ला करायला आला होता असे मला वाटले कारण हल्लेखोर त्याच्या खोलीत होता, असेही करीनाने पोलिसांकडे नोंदवलेल्या जबाबात म्हटले आहे.

चोरीच्या उद्देश नव्हता?''चोर घरात असताना त्याने कोणत्याही मौल्यवान वस्तूंना किंवा दागिन्यांना हात लावला नाही. त्या वस्तू त्याने चोरल्या नाहीत. आरोपीने घरात चाकूचा धाक दाखवून नर्स लिमाकडे एक कोटीची मागणी केली,'' असे करीनाने जबाबात म्हटल्याची माहिती पोलिसांच्या सूत्रांनी दिली आहे. अज्ञात व्यक्ती घरात चाकू घेऊन फिरत असल्याचे पाहिल्यानंतर करीना घाबरली होती, असे तिच्या जबाबामधून स्पष्ट होत आहे. हल्लेखोराने घरातील कुठलीही वस्तू चोरली नाही, असे करीनाने जबाबात सांगितले. घरातील कपाटामध्ये ज्वेलरी तशीच होती, असेही करीना म्हणाली.

मदतीसाठी आरडाओरड सैफ अली खानवर या व्यक्तीने हल्ला केल्यानंतर घरातील नर्स आणि करीनाने मदतीसाठी आरडाओरड केली, असेही सांगितले. या घटनेने मानसिक तणावात असलेल्या करीनाला घटनेनंतर बहीण करिष्माने तिच्या घरी नेले. दरम्यान, त्यापूर्वी रात्री जखमी अवस्थेत सैफला रुग्णालयात नेण्यासाठी कार उपलब्ध नसल्याने रिक्षाने त्याला २ ते अडीच किलोमीटर अंतरावर असलेल्या लिलावती रुग्णालयात नेण्यात आले.

अनेकांनी घेतली करीनाची भेट अनेक कलाकारांनी करिष्माच्या घरी जाऊन करीनाची भेट घेतली. यामध्ये अभिनेता संजय दत्तपासून अनेक निकटवर्तीयांचा समावेश आहे. दुसरीकडे सैफची कन्या सारा अली खान, रितेश देशमुख यासारख्या कलाकारांनी लिलावतीमध्ये जाऊन सैफची भेट घेतली आहे.

यांचीही चौकशी मात्र अटक कोणालाच नाही वांद्रे पोलिसांनी सैफ आली खान याच्या घरी सुतारकाम करणाऱ्या कामगारांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. कालच पोलिसांनी सैफच्या इमारतीमध्ये फ्लोअर पॉलिशिंगचे काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांचीही या प्रकरणामध्ये चौकशी केली. त्याचप्रमाणे पोलिसांनी सैफला लिलावती रुग्णालयात घेऊन गेलेल्या रिक्षा चालकाचाही जबाब नोंदवून घेतला. सैफ अली खान हल्लाप्रकरणी अजूनही कोणाला अटक करण्यात आलेली नाही अशी माहिती पोलिसांकडून मिळाली आहे.

# पोहळेतील श्रमिक वाचनालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अभियान विविध उपक्रमांनी संपन्न

पन्हाळा : पोहाळे तर्फ बोरगाव (ता.



पन्हाळा) येथील श्रमिक वाचनालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले.राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्यावतीने शासनमान्य वाचनालयांसाठी कृती कार्यक्रम दिला होता. त्यानुसार श्रमिक वाचनालयात विद्या मंदिर पोहाळे तर्फ बोरगाव प्राथमिक शाळेच्या सहकार्याने वाचन कौशल्य कार्यशाळा घेण्यात आली. वाचनालयाचे अध्यक्ष जयसिंगराव माळवी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.ते म्हणाले,विद्यार्थ्यांनी विरामचिन्हे लक्षात घेऊन आरोह– अवरोहांसह वाचन केले पाहिजे. यावेळी श्री. माळवी यांनी 'श्यामची आई' या पुस्तकाचे आदर्श वाचन करून दाखवले.त्यांनतर 'सामुहिक वाचन' हा उपक्रम संपन्न झाला.यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके देऊन सामूहिक वाचन घेण्यात आले.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.याच दिवशी वाचन संवादही झाला.

गत सप्ताहात ग्रंथप्रदर्शन पार पडले. प्रदर्शनात वाचनालयातील निवडक ५०० पुस्तके प्रदर्शित करण्यात आली.बालसाहित्य ,बालकविता,एकांकिका,कथासंग्रह याशिवाय गाजलेली मराठी,हिंदी,इंग्रजी पुस्तके प्रदर्शित केली.विद्यार्थी,शिक्षक व पालकांनी पुस्तके हाताळली.बहुतेकांनी वाचनालयातच वाचनाचा आनंद घेतला.याशिवाय पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा घेण्यात आली.विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण सादर केले.तसेच वाचलेल्या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना विषद केली.

वाचनालयाच्या विनावर्गणी मोफत बाल वाचनालयाकरिता विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी करण्याचा उपक्रमही राबविण्यात आला.जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर व तंत्र सहाय्यक उत्तम कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाचनालयाचे अध्यक्ष जयसिंगराव माळवी,उपाध्यक्ष आनंदा जाधव,विश्र्वास माळवी,दगडू माळवी,हंबीरराव पाटील,संदीप माळवी,सतीश माळवी,बबन माळवी,संदीप खवळे आदींनी संयोजन केले. मुख्याध्यापक मारुती खोत,के.के.चौगले,भाऊ कांबळे,जी.के.कांबळे,पांडुरंग कामत,बळीराम काकडे यांचे सहकार्य लाभले.ग्रंथपाल भाग्यश्री माळवी यांनी स्वागत केले.शाकिरा नाईकवडे यांनी आभार मानले.

# शहरी वाहतुकीसाठी एकात्मिक तिकीट प्रणाली – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई,: सार्वजनिक वाहतूक प्रणाली एका सिंगल मोबिलिटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असून, त्यादृष्टीने मुंबईतील पायाभूत



सुविधा विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमामुळे प्रवाशांना केवळ ३०० ते ५०० मीटर चालून सार्वजनिक वाहतूक सुविधेचा लाभ घेता येईल. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जलद आणि सुलभ वाहतूक सेवा देण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस आणि रेल्वे मंत्री अश्र्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत मुंबईतील एकात्मिक तिकीट सेवा प्रणालीवर चर्चा झाली. या बैठकीत 'मित्र'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, तसेच मध्य, पश्र्चिम रेल्वे आणि महामुंबई मेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, मुंबईसाठी लोकल रेल्वे ही जीवनवाहिनी आहे. एकात्मिक तिकीट सेवा प्रणालीमुळे प्रवाशांसाठी कनेक्टिव्हिटी जलद व सुलभ होणार असून, महसूल वाढीसह सार्वजनिक सेवांचा अधिकाधिक वापर होईल. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून टॅक्सी आणि इतर सेवांसोबत या प्रणालीचे एकत्रीकरण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. या प्रकल्पामुळे प्रवाशांना सहजगत्या एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व वाहतूक सुविधा मिळतील. यामुळे वाहतुकीचे सुलभीकरण होऊन प्रवाशांचा वेळ वाचणार आहे, तसेच वाहतूक व्यवस्थेतील अडथळे दूर होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी सांगितले की, मुंबईत सध्या ३,५०० लोकल सेवा कार्यरत आहेत. येत्या काळात आणखी ३०० लोकल सेवा सुरू करण्यासाठी १७,१०७ कोटी रुपयांची गुंतवणूक रेल्वेकडून करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांमध्ये १.७० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य सरकार मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र शासन शहरी वाहतुकीसाठी एकात्मिक तिकीट प्रणाली राबविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (चखढ–) च्या नेतृत्वाखालील या उपक्रमाचे उद्दिष्ट विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी तिकीट प्रक्रिया एकसंध व सुलभ करणे आहे. यासाठी ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (जछऊ) प्लॅटफॉर्मचा तांत्रिक आधार घेतला जाणार आहे.

# दयानंद विज्ञानमध्ये राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन भौतिकशास्त्र प्रश्र्नमंजूषा स्पर्धा

लातूर – येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दि.१२ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन भौतिकशास्त्र प्रश्र्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.या स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. केरळ,पुदुचेरी, महाराष्ट्र,तामिळनाडू आणि तेलंगणा अशा विविध राज्यांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे व भौतिकशास्त्र विभागप्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्पर्धा संयोजक डॉ.एस.डी.लोखंडे यांच्या देखरेखीखाली ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडली.महाराष्ट्रासह इतर राज्यांतील जवळपास ९५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

